शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी

विषय – मराठी (प्रथम भाषा)

घटक 2 - शब्दसंपत्ती

भारांश – 24%   प्रश्नसंख्या – 6   एकूण गुण 12

2.1 समानार्थी शब्द

➢ हे लक्षात ठेवा

एकाच अर्थाचे वापरण्यात येणाऱ्या शब्दांना समानार्थी शब्द म्हणतात. अशा शब्दांचा आपल्याकडे संग्रह असणे आवश्यक आहे.

उदा. चंद्र – इंदू, शशी, विधू,सोम,हिमांशू, सुधांशू, सुधाकर,निशानाथ, रजनीनाथ.

प्र. 1 व 2. दिलेला शब्द व त्याचा अर्थ यानुसार चुकीची जोडी असणारा पर्याय निवडा.

1) प्रतिज्ञा – शपथ   2) प्रार्थना – आर्जव   3) मुभा –लाभ   4) फोल – व्यर्थ

उत्तर – पर्याय - 3

स्पष्टीकरण – मुभा म्हणजे परवानगी. बाकी सर्व शब्द समानार्थी आहेत.

प्र. 2 1) देश – राष्ट्र   2) कप्पा – खण   3) प्रभा – तेज   4) सस्य – रहस्य

उत्तर – पर्याय – 4

स्पष्टीकरण – सस्य शब्दाचा अर्थ धान्य असा होतो. बाकी सर्व शब्द समानार्थी आहेत.

2.2 विरुद्धार्थी शब्द

➢ हे लक्षात ठेवा

परस्पर विरुद्ध अर्थ असणारे शब्द एकमेकांचे विरुद्धार्थी शब्द असतात. एका शब्दाचे अनेक शब्द विरुद्धार्थी असू शकतात. तुमच्या अभ्यासात आलेल्या सर्व विरुद्धार्थी शब्दांचा संग्रह करून अभ्यास करा.

उदा. देव X दैत्य, दानव, राक्षस, असुर

प्र.1 पुढे दिलेल्या कोणत्या पर्यायातील शब्दांची जोडी परस्पर विरुद्धार्थी शब्दांची आहे ते ओळखा.

1)सुंदर X सुरेख 2)संहार X नाश 3) होडी X नाव 4) प्रसरण X आकुंचन

उत्तर – पर्याय- 4

स्पष्टीकरण – सर्व जोड्या समानार्थी शब्दांच्या असून प्रसरण आकुंचन ही जोडी विरुद्धार्थी शब्दांची आहे.

प्र. 2

1) सुज्ञ X अज्ञ 2) डाम X डौल 3) दीन X दुबळा 4) दान X धर्म

उत्तर – पर्याय- 1

स्पष्टीकरण – सर्व जोडशब्द असून सुज्ञ X अज्ञ ही जोडी विरुद्धार्थी शब्दांची आहे.

2.3 शुद्ध / अशुद्ध शब्द

मराठी भाषेत अ/आ-कार, इ/ई-कार, ए/ऐ-कार, ओ/औ-कार, अनुस्वार, विसर्ग जोडशब्द इ. नुसार शब्द लिहिण्याचे नियम बनविले आहेत, त्या नियमानुसार लेखन करणे म्हणजे शुदालेखन होय.

शुद्धलेखनाचे काही महत्त्वाचे नियम –

अनुस्वार –

- नाकातून स्पष्टपणे उच्चार ज्या अक्षरांचा होतो, त्या अक्षरावर अनुस्वार देतात.

उदा. अंत, चिंच, कंबर

- अनेकवचनी नामांच्या सामान्यारुपावर व अनेकवचनी सर्वनामांच्या सामान्यारुपावर – उदा. मित्रांसाठी, मुलांना, त्यांनी
- नामांचे आदरार्थी बहुवचन असेल तर सामान्यरूपावर अनुस्वार देतात. – उदा. संत तुकारामांनी, गुरुजींनी

ऱ्हस्व- दीर्घ अक्षरे -

- इ-कारान्त आणि उ-कारान्त शब्दातील शेवटचे अक्षर नेहमी दीर्घ लिहावे.
  उदा. मी, कवी, गुरू
  हेच शब्द जोडाक्षरात आल्यास ऱ्हस्व लिहावेत.
  उदा. कविचरित्र
- अ-कारान्त शब्दातील उपांत्य अक्षराचा इ-कार किंवा उ-कार दीर्घ असतो.
  उदा. बहीण,फूल
  संस्कृत मधून मराठीत आलेल्या शब्दांना हा नियम लागू नाही.
  उदा. मंदिर , कुसुम
- काही शब्दांतील अंत्य अक्षर दीर्घ आल्यास उपांत्य अक्षर हे बहुदा ऱ्हस्व असते.
  उदा. दिवा, महिना
  परंतु संस्कृतमधून मराठीत आलेल्या तत्सम शब्दांना हा नियम लागू नाही.
  उदा. पूजा, क्रीडा
- मराठी शब्दांतील अंत्य अक्षर दीर्घ स्वरांत असेल तर अशा वेळी उपांत्य 'इ-कार व ऊ-कार' ऱ्हस्व असावे.
  उदा. सरिता,गरिबी
- गावाच्या नावात शेवटी येणाऱ्या 'पूर' या शब्दातील 'पू' दीर्घ लिहावे.
  उदा. नागपूर, पंढरपूर
- अनुकरण वाचक शब्दातील दुसरे व चौथे अक्षर नेहमी दीर्घ लिहितात.
  उदा. मुळूमुळू , हळूहळू

सामान्यरूप –

- 'इ-कारान्त' व 'उ-कारान्त' संस्कृत शब्दाचे सामान्यरूप करताना अंत्य स्वर दीर्घ होतो. प्रभू-प्रभूला, रवि-रवीला
- म्रराठी शब्दाचे उपांत्य अक्षर दीर्घ 'ई' किंवा 'ऊ' युक्त आल्यास त्याचे सामान्यरूप करताना ते उपांत्य अक्षर ऱ्हस्व उच्चारतात म्हणून ते ऱ्हस्वच लिहितात.
  जीव – जिवाचे, पंढरपूर – पंढरपुरात
  संस्कृत मधून मराठीत आलेल्या शब्दांना हा नियम लागू नाही.
  परीक्षा – परीक्षेसाठी ,गीता – गीतेचा
  प्र.1 खाली दिलेल्या शब्दांपैकी अशुद्ध शब्द ओळखा.

1) सांस्कृतिक 2) येऊन 3)अनुक्रमणिका 4) कीडा

उत्तर- पर्याय - 4

स्पष्टीकरण – कीडा हा शब्द 'किडा' असा पाहिजे.

प्र.2 खाली दिलेल्या शब्दांपैकी शुद्ध शब्द ओळखा.

1)अवणी 2) मानसीक 3) दुडूदुडू 4) हुकुम

उत्तर- पर्याय – 3

स्पष्टीकरण – पर्याय 1,2,3 अवनी, मानसिक, हुकूम असे हवेत.

सौ. जयश्री सुनिल पलांडे

विद्यार्थी मनोगत -

शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये मराठी विषयांमध्ये चांगले गुण मिळवायचे असतील तर पाठ्यपुस्तकाचे आकलनपूर्वक व समजपूर्वक वाचन करण्यासोबतच अवांतर वाचन अत्यंत महत्त्वाचे आहे. पाठ्यपुस्तकांमध्ये तसेच अवांतर वाचनामध्ये आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ समजावून घेणे, व्याकरणाचा बारकाईने व सातत्यपूर्ण अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे असते. शाळेत शिक्षकांनी वर्षभर अनेक सराव चाचण्या घेतल्या. ज्या ठिकाणी माझ्या चुका होत्या त्या ओळखून शिक्षकांनी मार्गदर्शन केले. त्यामुळे चुका कमी

होत गेल्या व राज्यामध्ये मी प्रथम क्रमांक मिळवू शकले. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी योग्य मार्गदर्शनासोबतच नियमित सराव अत्यंत आवश्यक असतो. या मूलमंत्रामुळेच आमच्या शाळेचा निकाल राज्यामध्ये सर्वोत्कृष्ट आहे.

- संस्कृती सोमनाथ वाळके

पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा 2025 शहरी विभाग
-292 गुण - राज्यात प्रथम क्रमांक)
वसुंधरा प्राथमिक विद्यालय आष्टी, जिल्हा- बीड.

क्यू आर कोड मध्ये देणे

अंतिम परीक्षेत विचारले गेलेले काही प्रश्न –

प्र. 1 पुढीलपैकी शुध्द शब्द ओळखा.(2020)

1) साहित्यीक 2) स्फुर्तिस्थान 3) विरवृत्ती 4) द्वीपसमूह.

प्र. 2 पुढीलपैकी अशुद्ध शब्द कोणते ? दोन पर्याय निवडा. (2021)

1) स्मृतीदिन 2) परिवर्तन 3) दैन्यरहीत 4) गुरुवर्य

प्र. 3 पुढीलपैकी अशुद्ध शब्द किती आहेत ? (2022)

(अधुनिक, नावीन्य, मुल्य, नातेवाईक, वैद्यकिय, स्वीकार, येवून, ठेवून, ठराविक)

1) पाच 2) चार 3) सहा 4) तीन

प्र.4 पुढे दिलेल्या शब्दांमध्ये एकूण किती शब्द शुद्ध आहेत? (2023)

(कुजबूज, शीलाखंड, शक्तिशाली, तत्वज्ञ, निर्धारीत, पुरक,भुमिपूत्र)

1) दोन 2) तीन 3) एक 4) चार

प्र. 5 खालीलपैकी शुद्ध शब्द ओळखा. (2018)

1) अत्यंतिक 2) प्रावीण्य 3)छंदिष्ठ 4) भौमित्तिक

प्र. 6 ‘वसन’ या शब्दाला योग्य दोन समानार्थी शब्द निवडा . (2018)

1) निवास 2) अंबर 3) वस्त्र 4) आसन

प्र. 7 ‘बक्षीस’ या शब्दाला योग्य विरुद्धार्थी दोन शब्द निवडा.

1) अभिनंदन 2) दंड 3) चढाओढ 4) शिक्षा

प्र. 8 पुढील शब्दाचा योग्य समानार्थी शब्द निवडा.

‘संरचना’

1) नजाकत 2) भूमिका 3) भूषण 4) ठेवण

प्र. 9 पुढीलपैकी कोणती जोडी विरुद्धार्थी शब्दांची नाही. दोन पर्याय निवडा. (2023)

1) सादृश X अदृश्य 2) धादांत X पूर्णतः

3) त्रोटक X विस्तृत 4) प्रधान X गौण

प्र. 10 'क्लेश' या शब्दाचा योग्य विरुद्धार्थी शब्द कोणता ? (2022)

1) दु:ख 2) क्रोध 3) सुख 4) खंत

प्र. 11 'करुणा' या शब्दाचा समानार्थी शब्द निवडा. (2024)

1) विनंती 2) प्रार्थना 3) याचना 4) कीव

प्र. 12 'निकट' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द निवडा. (2024)

1) दूर 2) जवळ 3) संलग्न 4) समीप

1. 4
2. 1 व 3
3. 1
4. 1
5. 2
6. 2 व 3
7. 2 व 4
8. 4
9. 1 व 2
10. 3
11. 4
12. 1